# सेवक वार्ता

जून -२०२१ वर्ष -२, अंक - ८

सेवानिवृत्त वन कर्मचारी संघ, महाराष्ट्र, पुणे

कार्यालय - ब-८, सारस नगर सोसायटी, शुक्रवार पेठ, पुणे - २


## सेवक संघ कामाबाबत

### सेवक संघ कन्हारगाव वन्यजीव अभयारण्याचा व्यवस्थापन आराखडा तयार करणार !

**नुकतेच अधिघोषित करण्यात आलेल्या कन्हारगाव वन्यजीव अभयारण्य व्यवस्थापन आराखडा तयार करण्याची गरज लक्षात घेऊन प्रधान मुख्य वन संरक्षक (वन्यजीव) महाराष्ट्र राज्य यांना श्री. पत्की सर यांच्या केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने अभयारण्य व्यवस्थापन आराखडा बनविण्याच्या कामास त्यांनी त्यांचे दिनांक ३१ मे २०२१ तत्वतः मान्यता दिली होती. त्या अनुषंगाने आराखडा तयार करणे संबंधात मुवसं (प्रा) चंद्रपूर यांचेशी समय समझोता अभिलेख दि.१८-६-२०२१ रोजी स्वाक्षरीत करणेत आला. दि.१९-६-२१ रोजी श्री. पत्की सर यांचे मार्गदर्शनाखाली कन्हारगाव वन्यजीव अभयारण्याचा दौरा करणेत आला. हा आराखडा तयार करण्यासाठी श्री. विश्वास सावरकर, माजी संचालक, भारतीय वन्यजीव संस्थान, डेहराडून यांचे अधिपत्याखाली चमूचे गठण करण्यात आले आहे. श्री. पत्की सर यांच्या या विशेष कार्यपूर्तीबद्दल सेवक संघ परिवारातर्फे त्यांचे धन्यवाद. सेवक संघास अशा प्रकारचे काम मिळाल्याने मानाचा तुरा शिरपेचात प्राप्त लागला आहे.**

### वृक्षधन पुस्तकाचे विमोचन

कै.विजय भोसले लिखीत वृक्षांच्या माहितीपर वृत्तपत्रातील लेखांचे संकलन वृक्षधन नामक पुस्तक रूपात अमरावती शाखेतर्फे करणेत आले आहे. या वृक्षधन पुस्तकाचा विमोचन कार्यक्रम मा.ना. यशोमती -ताई ठाकूर,महिला व बालविकास मंत्री तथा पालकमंत्री, अमरावती यांचे शुभ हस्ते अमरावती येथे पार पडला. विमोचन कार्यक्रमास श्रीमती भोसले व वनाधिकारी अमरावती विभाग,सामाजिक वन विभाग,सेवक संघ अमरावती शाखा सदस्य यांचे उपस्थिती होती. वृक्षधन पुस्तकाचा विमोचन कार्यक्रम सुटसुटीत व घरगुती झाला. पुस्तकाचे विमोचनामुळे कै. भोसले यांच्या कुटुंबियांना समाधान व कै.भोसले यांचे आत्म्यास आनंद झाला असेल अशी भावना श्री. पत्की यांनी व्यक्त केली.अमरावती शाखेतर्फे निसर्गप्रेमी कै.भोसले यांना ५ जून या पर्यावरण दिवशी अनोखी सलामी दिली.



वृक्षधन पुस्तकात वनांमधील विविध वृक्ष,वनस्पतींची शास्त्रीय व उपयुक्त माहिती समाविष्ट असून स्व.विजय भोसले,माजी वनाधिकारी यांनी आपला दीर्घ अनुभव निसर्गाप्रतीचे प्रेम व जिज्ञासा याद्वारे परिश्रमपूर्वक हा ग्रंथ सिद्ध केला आहे.वनसंपदा व जैवविविधतेचे महत्व अधोरेखित करणारा हा ग्रंथ मोलाचा दस्तावेज आहे.नव्या पिढीत पर्यावरणाप्रतीआस्था जागविणे पर्यावरणाचे महत्त्व तरुणाईच्या मनावर बिंबवणे यासाठी स्व. भोसले यांचे पुस्तक उपयुक्त ठरेल; असे श्रीमती ठाकूर यांनी यावेळी सांगितले. कार्यक्रमास संजय जगताप, राजेंद्र पवार, अशोक कविटकर, श्याम मक्रमपुरे, संजय निंभोरकर, संतोष धापड, हरिभाऊ मोहोड आदी उपस्थित होते .

या अंकात . . . .


सेवक संघ कन्हारगाव वन्यजीव अभयारण्याचा व्यवस्थापन आराखडा तयार करणार ! ..१
वृक्ष धन पुस्तकाचे विमोचन . . १
विशेष वृत्त . . . . . . . . . १
कोरोना निधन वार्ता.. . . . . २
सदस्य वार्ता . . . . . २
सेवक संघ,उपविधीची ओळख . . . .२


### विशेष वृत्त

**बांबू फुलोरापश्चात निष्कासन व इतर कामांचा व्यवस्थापन आराखडा तयार करण्यासाठी गठित चमूमध्ये श्री. कुंभकर्ण,GIS कुशल सदस्यांचा समावेश करणेत आला आहे.**

## सेवकसंघ शाखांचे बळकटीकरण

**सेवक संघ महाराष्ट्रचे अध्यक्ष श्री शिरीष अस्थाना यांनी मागील कार्यकारी समितीच्या सभेत सेवक संघाच्या विविध शाखापैकी ज्या शाखा मोठ्या प्रमाणात चांगले काम करत आले आहेत त्या शाखांचे बळकटीकरण करण्याचा मनोदय व्यक्त केला होता. त्या अनुषंगाने धुळे व अमरावती सेवक संघ शाखांना कार्यालयीन कामासाठी लॅपटॉप खरेदीसाठी निधी देण्यात आला असून लॅपटॉप खरेदी करणेत आली आहे.**

### भावपूर्ण श्रद्धांजली

राज्यात कोरोना संसर्गाच्या साथीमुळे वनरक्षक ते विभागीय वन अधिकारी या संवर्गात १३० व कार्यालयीन कर्मचारी संवर्गात २० कर्मचाऱ्यांचे दुर्दैवी निधन झाले आहे. त्यांची माहिती अशी.
(१) विवअ-२ (२) सवसं-२ (३) वन परिक्षेत्र अधिकारी-४ (५)वनपाल-२४ (६) वनरक्षक -३३ (८)मजूर-६५ (९) कार्यालय अधीक्षक-३ (१०) लेखापाल- ५ (११)लिपिक-६ (१२) इलेक्ट्रिशियन-१, (१३)मेस सर्वंट-१, (१४) शिपाई-१ (१५)वाहन चालक-३.
त्यांना सेवक संघ महाराष्ट्र परिवारातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली व त्यांचे कुटुंबियांना हे दुःख सहन करण्याची शक्ती देवो, हि प्रभूचरणी प्रार्थना.

### श्री.एस. एस. दायमा यांचे निधन

श्री.एस. एस. दायमा १९६६-६८चे AIFC यांचे पोस्ट-कोविड उपचाराचे वेळी दि. २१-०६-२०२१ रोजी नाशिक येथे दुःखद निधन झाले. अत्यंत प्रामाणिक, अभ्यासू व कर्तव्यनिष्ठ वनाधिकारी म्हणून त्यांना ओळखले जायचे. ईश्वर त्यांचे आत्म्यास शांती देवो ही प्रार्थना.

## सेवक संघ,उपविधीची ओळख

### सेवक संघ, महाराष्ट्राचा सुधारीत उपविधी (भाग - २)

**(४)सभासदत्व व त्यांची नोंदणी करण्याची पद्धत: जे वन कर्मचारी महाराष्ट्र राज्याच्या सेवेतून सेवा - निवृत्त झाले असतील अथवा भूतपूर्व असतील आणि ज्यांचे निवासस्थान अथवा वास्तव्य महाराष्ट्र राज्यात आहे त्यांना सेवानिवृत्त वनकर्मचारी समजले जाईल.अशांना संघाचे सभासद होता येईल. प्रत्येक सेवानिवृत्त/ भूतपूर्व सभासदास विहीत नमुन्याच्या अर्जामध्ये माहिती भरून सोबत प्रवेश फी रू.१०/-(दहा मात्र)भरून सभासदत्व देण्याची विनंती करता येईल.असा अर्ज कार्यकारी मंडळासमोर ठेवून तो मंजूर करून घ्यावा लागेल.सभासदत्व दिल्या-बाबतची माहिती संघाच्या सभेत जाहीर केली जाईल.**

**(५) सभासदांचे प्रकार:(१)आजीव सभासद: जे सेवानिवृत्त /भूतपूर्व वन कर्मचारी एक रकमेने संघास रु.२०००/- (दोन हजार मात्र)वर्गणी जमा करतील अशांना आजीव सभासद होता येईल.(२) सर्व-साधारण सभासद:जे सेवानिवृत्त /भूतपूर्व वनकर्मचारी संघास वार्षिक वर्गणी रू.२००/- (दोनशे मात्र) जमा करतील ते सर्व-साधारण सभासद होण्यास पात्र असतील.(६)सभासदत्व रद्द करणे: (१) ज्या सभासदांचे वर्तन संघाचे हितास बाधा आणणारे आहे असे आढळून आल्यास, सर्वसाधारण सभा त्या सभासदाचे सभासदत्व रद्द करू शकेल.(२) एखादा सभासद पूर्वसूचना न देता लागोपाठ बारा मासिक सभांना अनुपस्थित राहिला तर, अथवा एखाद्या सभासदाने सूचना केल्यानंतर - सुद्धा तीन महिन्यांमध्ये वार्षिक वर्गणी भरुन सभासद -त्वाचे नूतनीकरण न केल्यास,त्या सभासदाचे सभासदत्व आपोआप रद्द होईल. मात्र अशा सभासदां -कडून पुन्हा नव्याने सभासद-त्वासाठी अर्ज घेऊन त्यांना सभासदत्व देता येईल. तो अधिकार कार्यकारी मंडळास राहील.**

### विशेष असे काही. . .

श्री. एन. आर. निकम, सेवानिवृत्त स.व.सं. व आजीवन सदस्य, धुळे शाखा यांनी सेवक संघास रू.२००/- देणगी दिली आहे.त्यांचे आभार.

दि. १९-६-२०रोजी कन्हारगाव अभयारण्य क्षेत्र येथे सेवक संघ चमूने वनस्पती विशेषज्ञ डॉ.देशमुख यांच्यासोबत दौरा केला व वनस्पतीचे सर्वेक्षणबाबत कार्यक्रम निश्चित केला.





**केवळ खाजगी वितरणासाठी**
**प्रकाशक - सेवक संघ, महाराष्ट्र.पुणे**
**संपादन - एस. के. गवळी**